3801-

# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण


९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org


क्रमांक : बैठक-१८२३/प्र.क्र. २७८/बैठक/३ ऑक्टोबर/२०२३/१२०५ दिनांक : 16 OCT 2023

## बैठकीचे इतिवृत्त

मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा. आयोजित करण्यात आली होती. तथापि सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथील दिनांक २९/०९/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरील दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहिर करण्यात आली असल्याने <u>प्राधिकरणाची क्रमांक ७३ वी बैठक दिनांक २९ सप्टेंबर २०२३ रोजी ऐवजी मंगळवार, दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ रोजी घेण्यात आली, सदरील बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे</u>,-

प्राधिकरणाचे सदस्य डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे प्रतिनिधी (दूरदृष्यप्रणालीद्वारे), श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. विलास जी. गायकर, माजी कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड, २) प्रा.डॉ. दिलीप गोविंदराव म्हैसेकर, माजी कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ३) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व ४) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

<u>विषय क्रमांक १:</u> <u>प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७२व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.</u>

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७२व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१) तथापि प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ व ३१/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील अनुक्रमे निर्णय बाब क्र. ३ *(प्रपत्र-अ)* व ४ (क) *(प्रपत्र-ब)* मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश प्रकरणी <u>प्रपत्र-फ</u> प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

<u>विषय क्रमांक २: प्राधिकरणाच्या क्रमांक ७२व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.</u>

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७२व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या क्रमांक ७२व्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजी झालेल्या ७२ व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक ११/०९/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br><br>तसेच मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ३ मधील प्रपत्र-अ नुसार विविध व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेश प्रकरणी सोबत जोडलेल्या <u>प्रपत्र-फ</u> नुसार सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर संबंधित महाविद्यालयांची प्रवेश मान्यते पत्रे निर्गमित करण्यात येतील. |
| २. | ४(क) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यात येईल. |
| ३. | ४(ख) | श्री. पंचम खेमराज लॉ. कॉलेज, सावंतवाडी या महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व २०१९-२० मधील व्यावसायिक विधी - ३ वर्षे या अभ्यासक्रमाचा प्रवेश मान्यतेबाबत | प्राधिकरणाच्या निर्देशास अनुसरुन संबंधित महाविद्यालयाने दिनांक ६/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शपथपत्र सादर केले आहे. शपथपत्रामध्ये नमूद बाबींचा सविस्तर विचार करता सदर महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१६-१७, २०१७-१८ व २०१९-२० मधील विद्यार्थ्यांच्या त्रुटी असलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात आली. (<u>प्रपत्र-ग</u>) |
| ४. | ४(ग) | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांस प्रवेशित प्रवेशित विद्यार्थ्यांची १% निवडक पध्दतीने प्रवेश पडताळणी/छाननी प्रक्रिया तसेच शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालनालयाने दर्शविलेल्या त्रुटींमुळे ना मंजुर असलेल्या प्रवेशांबाबत पुनश्च: तपासणी/पडताळणी प्रक्रियेकरिता झालेल्या खर्चास मान्यता देण्याबाबत. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ५. | ४(घ) | प्रवेश नियामक प्राधिकरण व सीईटी कक्षातील कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी यांना वॉर-रुम चे मानधन देण्याबाबत. | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार सीईटी कक्षाच्या दिनांक ०६/०९/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सीईटी कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वार-रुमचे मानधन अदा करण्यात आले आहे. प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांना अदा करावयाच्या मानधनाबाबत कार्यवाही सुरु आहे. कार्यवाही पूर्ण करुन आगामी बैठकीत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. |
| ६. | ४(ङ) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पर्यंतच्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश खालील संचालनालयांनी सादर केलेल्या पुन:श्च पडताळणी अहवालानुसार मान्यता देण्याबाबत,-<br>अ) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.<br>आ) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे.<br>इ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. | प्राधिकरणाचे निर्देश संबंधितांना दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहेत. |
| ७. | ४(च) | अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" निश्चित करण्याबाबत | प्राधिकरणाच्या निर्देशानुसार दिनांक १४/०९/२०२३ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. मान्यता देण्यात आलेल्या सुत्रानुसार प्रक्रिया शुल्क स्विकारण्याबाबत निर्देश देण्यात आले. |
| ८. | ४(छ) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे प्राधिकरण व सीईटी कक्षातील अधिकारी / कर्मचारी यांना मानधन अदा करण्याबाबत | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार दिनांक ६/०९/२०२३ व ११/०९/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये अनुक्रमे सीईटी कक्ष व प्राधिकरण कार्यालयाद्वारे कार्यवाही करण्यात आली आहे. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला.

<u>विषय क्रमांक ३:</u> **<u>महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५)(४) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिये दरम्यान उद्भवलेल्या तक्रारींचा व तद्नुषंगाने घेतलेल्या निर्णयाचा आढावा.</u>**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरु झालेल्या आहेत. या संदर्भात अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार सदरील प्रक्रिये दरम्यान हितसंबंधित घटकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी व तद्नुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरणास अवगत केला <u>(प्रपत्र-अ)</u>. याबाबत सीईटी कक्षातील सर्व संबंधित परीक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी अभ्यासक्रम-निहाय आढावा सादर केला व त्यानुसार सांगोपांग चर्चा करण्यात

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

आली. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली, याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विभाग | एकुण तक्रारी | संबंधित परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक |
|---|---|---|---|
| १. | तंत्र शिक्षण | ३७ | श्री. आर. एल. लोढें. |
| २. | उच्च शिक्षण | ३३ | डॉ. जी.टी. केदार व श्री. जे.एम. पाटील. |
| ३. | वैद्यकीय / आयुष शिक्षण | ३२ | श्री. सिध्देश नर. |
| | एकुण | १०२ | |

वरील तक्रारींवर परिक्षा समन्वयक / सहा. परिक्षा समन्वयक यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर सादरीकरण करुन त्यावर सांगोपांग चर्चा झाली. तसेच या संदर्भात असे निर्दशनास आले की, वरील तालिकेतील तंत्रशिक्षण विभागांतर्गत काही अभ्यासक्रम, उच्च शिक्षण, कला व वैद्यकीय आणि आयुष शिक्षण यांची प्रवेश प्रक्रिया अद्यापही सुरु असल्याने प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर परिपूर्ण अहवाल संबंधितांनी सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या सामाईक प्रवेश परिक्षेबाबतचे अंदाजित वेळापत्रक सादर करण्याच्या सुचना सर्व संबंधित परिक्षा समन्वयक यांना देण्यात आल्या.

तसेच या विषयासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबतचे निर्देश देण्यात आले होते. परंतू संचालक सदरील बैठकीस अनुपस्थित राहिले, याबाबत नोंद घेण्यात आली.

<u>विषय क्रमांक ४: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>

(क) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तांवावर निर्णय घेण्याबाबत.</u>

अधिनियम २०१५ मधील तरतदूींच्या अनुषंगाने संबंधित संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आयुष शिक्षण, तंत्र शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले (<u>प्रपत्र-इ</u> प्रमाणे) व या संदर्भात प्राधिकरणाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले,-

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील आयुष अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN व ५) अनिवासी भारतीय (एनआरआय) संवर्गातून व संस्था स्तरावर महाविद्यालयांनी केलेली प्रवेश प्रक्रिया इ. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी करण्याप्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननीची कार्यवाही करावी. या प्रक्रियेमध्ये उपसमितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णयाकरिता प्राधिकरणापुढे ठेवावे.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

२) प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत, १% प्राधिकरण स्तरावरील उपसमितीच्या पडताळणी अहवालानुसार त्रुटी नाहीत तसेच प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, तथापि या प्रकरणी 'प्रवेश मान्यता प्रस्ताव' सादर करण्याबाबत महाविद्यालयांकडून झालेल्या दिरंगाई/निष्काळजीपणा बाबत शैक्षणिक वर्ष शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील महाविद्यालयांना प्रत्येकी रु. १ लाख दंड आकारण्यात येत आहे. सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र संबंधित महाविद्यालयांना सादर करणे बंधनकारक राहिल. यासंदर्भात संचालनालय/अभ्यासक्रम-निहाय <u>(प्रपत्र-ब/महाविद्यालय-निहाय )</u> प्रवेश मान्य करण्यात येत आहे, त्यानुसार प्रवेश मान्यता पत्रे निर्गमित करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

३) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांची नोंद घेण्यात आली <u>(प्रपत्र-क).</u>

४) अधिनियम २०१५ च्या कलम ९(५) च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव संचालकांचा प्रवेश पडताळणी अहवाल व प्रक्रिया शुल्कासह सादर केला आहे. संचालनालयाच्या प्रवेश पडताळणी अहवालात व प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात आलेल्या १% प्रवेश पडताळणीमध्ये त्रुटी नसलेल्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे. ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयांच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या दिनांक १/१०/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

५) अधिनियम २०१५ मधिल कलम ९(५) च्या तरतुदीनुसार ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीत प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केलेला नाही, अशा महाविद्यालयांतील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे <u>(प्रपत्र-ड)</u>. मान्यता नाकारण्यात आलेल्या प्रवेशांबाबत संबंधित विद्यापीठ व संचालक यांना कळविण्यात यावे.

६) प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता वरील परिच्छेद क्रमांक (२) मध्ये नमूद दंड आकारुन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, त्यानुसार दंडात्मक कार्यवाहीबाबत नमूद करुन संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यतेचे पत्रे निर्गमित करावी. <u>(प्रपत्र-ब</u> प्रमाणे).

(ख) <u>एस.व्ही.एस.एस. कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, लातुर यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष पदवी भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. जायेभाये शिवकन्या शिवाजीराव यांच्या प्रवेश प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ७७१८/२०२३ मधील दिनांक १५/०९/२०२३ रोजीचे न्यायालयीन आदेश.</u>

एस.व्ही.एस.एस. लातुर चे कॉलेज ऑफ फिजीओथेरेपी, लातुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक भौतिकोपचार अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शिवकन्या शिवाजीराव जायभाये यांच्या प्रवेश प्रकरणी दिनांक २८/०७/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

दिनांक १८/०८/२०२३ रोजी सुनावणीचे निर्णय पारीत करण्यात आलेले आहेत. तथापि प्रस्तूत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ७७१८/२०२३ मध्ये दिनांक १/०९/२०२३ व १५/०९/२०२३ रोजीच्या न्यायालयीन आदेशाच्या अनुषंगाने कु. शिवकन्या शिवाजीराव जायभाये यांच्या प्रवेश प्रकरणी दिनांक १८/०८/२०२३ रोजीच्या निर्णयातील खालील बाबी वगळून निर्णयाम बदल करण्यास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

*" It is also made clear that, the aforesaid candidate is not eligible to get any type of benefits w.r.t. scholarship from Social Welfare Department or any other concerned Authorities."*

याबाबत मा. न्यायालयास वकीलांमार्फत तातडीने अवगत करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

(ग) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 16 OCT 2023